Publication: Saamana
Date: 24/8/2019
Page: 9
Column: 1

सामना
शनिवार,
दि. २४ ऑगस्ट २०१९

## बिल भरणे झाले सोपे

*अदानी* इलेक्ट्रिसिटीने दहिसरमधील शैलेंद्र एज्युकेशन सोसायटीजवळील अदानी रिसीव्हिंग केंद्रामध्ये चौथे स्वयं-देयक किओस्क 'जिनिअस पे' सादर केले. याचे उद्घाटन खासदार गोपाळ शेट्टी यांच्या हस्ते झाले. या सेवेमुळे ग्राहकांची रांगेपासून सुटका होऊन त्यांचा वेळ वाचणार आहे. येथे चेक, रोख, डेबिट/क्रेडिट कार्डसच्या माध्यमातून बिलाची रक्कम स्वीकारण्यात येईल. ग्राहकांसाठी जिनिअस पे सेवा रोज सकाळी ७ ते रात्री ११ वाजेपर्यंत उपलब्ध असेल.